


दैनिक
अचूक वेध, अचूक बातमी
# अक्षराज
संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध
Email : newsaksharaj2021@gmail.com

खालील (क्यू आर कोड) स्कॅन करा...
आणि अक्षराज मीडियाच्या व्हाट्सअप चॅनल ला फॉलो करा व मिळवा सर्व घडामोडींचे अपडेट्स
एकाच वेळी एकाच ठिकाणी...
कृपया इथे स्कॅन करा
Plz Scan Here

वर्ष : ०५ | अंक : २३१, पाने : ०४, किंमत : ०३ रुपये | बुलडाणा, शुक्रवार, दि.०३ एप्रिल २०२६ | संपादक : विनोद कैलास गोरे | RNI NO. : MAHMAR/2022/82056

## महाराष्ट्रावर अवकाळी पावसाचं संकट, पुणे, लातूरसह उत्तर महाराष्ट्रात जोर'धार'

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.०२, पुणे :** एप्रिल महिना सुरु झाला, आणि या महिन्यांत उन्हाचा कडाका जाणवतो. मात्र, यंदा वातावरणात मोठा बदल पाहायला मिळालं आहे. भारतीय हवामान विभागाकडून (IMD) देशातील अनेक राज्यांमध्ये वादळी वाऱ्यासह पावसाचा इशारा देण्यात आला आहे. हवामान विभागानं वर्तवलेल्या अंदाजानुसार पुढील काही दिवस देशातील अनेक भागांमध्ये वादळी वारा आणि विजांच्या कडकडाटासह जोरदार पावसाची शक्यता आहे.

**जळगाव जिल्ह्यात काय स्थिती?**

जळगाव तालुक्यात आज सायंकाळी झालेल्या वादळी वाऱ्यासह पावसामुळे शेती पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झालं आहे. या अचानक आलेल्या वादळी पावसामुळे गहू ज्वारी बाजरी मका पिके जमीनदोस्त झाली आहेत. अमळनेर तालुक्यातील लोण, मांडळ, चिमनपुरी पिंपळे खु.सह परिसरात वादळी वाऱ्यासह पावसाची जोरदार हजेरी लावली. तर निम, पाडळसरे, कळमसरे, बोहरे मरवड परिसरात जोरदार वादळ आणि वाऱ्यासह पाऊस परिपक्व मका बाजरी, ज्वारी आडवी झाली आहे.

**लातूर जिल्ह्यात पावसाची स्थिती**

अवकाळी पावसामुळे लातूर जिल्ह्यातील अहमदपूर तालुक्यातील सताळा येथील टोमॅटो उत्पादक शेतकऱ्यांचे मोठं नुकसान झालं आहे. सताळा येथील एका शेतकऱ्यानं एक एकरात घेतलेली टोमॅटोची बाग अक्षरशः उध्वस्त झाली असून, जवळपास दीड लाख रुपये खर्च करून घेतलेले पीक अवकाळी पावसाने मातीमोल केलं. शेतात टोमॅटोचा चिखल तयार झाला असून, खराब झालेला माल उकिरड्यावर फेकण्याची वेळ या शेतकऱ्यावर आली.

**रंजना गिरी यांचा मृत्यू**

पुण्यात मुसळधार अवकाळी पावसाने महिलेचा बळी घेतला आहे.



मुसळधार पाऊस आणि जोरदार वाऱ्यामुळे पुणे शहरात झाड कोसळल्याची घटना घडली आहे. या घटनेत एका महिलेचा जागीच मृत्यू झाला आहे. तर झाडाखाली तिघेजण अडकल्याची माहिती पोलिसांनी मिळाली होती. त्यामुळे पुणे पोलीस तातडीने घटनास्थळी दाखल झाले होते. पोलिसांकडून झाडाखाली अडकलेल्या नागरिकांना वाचवण्यासाठी शर्थीने प्रयत्न करण्यात आले. या दरम्यान पुणे पोलिसांना दोघांना वाचवण्यात यश आलं. पण एक महिला जागीच दगावली आहे. रंजना नवनाथ गिरी असे मृत महिलेचं नाव आहे. पु ल देशपांडे उद्यानाजवळील नवश्या मारुती मंदिराजवळील सिंहगड रोड येथे संबंधित घटना घडली. दरम्यान, मुसळधार पावसात पोलिसांनी जीव धोक्यात घालून दोघांचे जीव वाचवले आहेत.

## वासुंदे, पळशी, खडकवाडी भागात घरांचे पत्रे उडाले
## बेभान वादळामुळे अनेक कुटुंबे रस्त्यावर...



**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.०२, पारनेर (अहिल्यानगर) :** पारनेर तालुक्याच्या उत्तर भागात निसर्गाने थैमान घातले आहे. वासुंदे, पळशी, वनकुटे, खडकवाडी आणि वडगाव सावताळ परिसरात बुधवारी सायंकाळी अचानक आलेल्या बेभान वादळी वाऱ्यासह जोरदार गारपीट झाली. या नैसर्गिक आपत्तीमुळे शेतकऱ्यांच्या हातातोंडाशी आलेला घास हिरावला गेला असून, अनेक कुटुंबांचे संसार उघड्यावर पडले आहेत. घरावरील पत्रे उडणे, विजेचे खांब कोलमडणे आणि शेती पिकांचे कोट्यवधींचे नुकसान झाल्याने परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

गेल्या आठवड्यात झालेल्या गारपिटीतून शेतकरी सावरत असतानाच पुन्हा एकदा निसर्गाने घाला घातला. वासुंदे परिसरातील बोकनकवाडी, शिक्री, खडकवाडीतील जांभळवाडी तसेच पळशीतील चिमणीबारव भागात वारे इतक्या वेगाने वाहत होते की बघता बघता उभ्या पिकांचे नुकसान झाले. प्रामुख्याने कांदा, मिरची, झेंडू, टरबूज, डाळिंब, गहू आणि आंबा या पिकांचे प्रचंड नुकसान झाले आहे. तसेच उन्हाळ्यासाठी साठवून ठेवलेला ज्वारी आणि बाजरीचा वैरणीचा चारा पावसात भिजल्याने कुजण्याची भीती निर्माण झाली असून जनावरांच्या चाऱ्याचा गंभीर प्रश्न उभा ठाकला आहे. वादळाचा वेग इतका भीषण होता की अनेक भागांत घरांवरील आणि गोठ्यांवरील पत्रे कागदासारखे उडून गेले. वासुंदे येथील बबन बोरुडे यांच्या घराचे पत्रे उडाल्याने त्यांचा पूर्ण संसार रस्त्यावर आला आहे. बन्सी गोवर्धन राठोड यांच्या घरावर झाड कोसळले, तर राजेंद्र शिरतार आणि विठ्ठल जेडगुले यांच्या घरांचे व जनावरांच्या गोठ्यांचे नुकसान झाले आहे. पळशी येथील राघू सोमा मधे आणि बाबाजी किसन जाधव यांची घरे पडल्याने ही कुटुंबे उघड्यावर पडली आहेत. खडकवाडीत राघू केदार, पोपट केदार, बुवाजी जाधव आणि शंकर केदार या गरीब शेतकऱ्यांच्या घरांचे अतोनात नुकसान झाले असून एका किराणा दुकानालाही वादळाचा मोठा तडाखा बसला आहे. आधुनिक शेतीसाठी बसवलेले सौर पॅनलही या गारपिटीतून सुटू शकले नाहीत. वासुंदे येथील माजी सरपंच रंगनाथ सैद, ताराबाई सैद आणि रामदास शिरतार यांच्या विहिरीवरील सौर पॅनल गारपिटीमुळे तुटले व उडून गेले आहेत, ज्यामुळे त्यांचे मोठे आर्थिक नुकसान झाले आहे. वाबळे वस्तीवर विजेच्या तारा तुटल्या असून अनेक ठिकाणी विजेचे खांब पडल्याने संपूर्ण परिसराचा वीजपुरवठा खंडित झाला आहे. दिलीप भागाजी पाटोळे यांच्या जनावरांच्या गोठ्याचेही मोठे नुकसान झाले आहे. मारुती भालेकर यांच्या कंपाउंडमध्ये विजेचा पोल पडल्याने मोठी भीती निर्माण झाली होती. साहेबराव गुंजाळ यांच्या शेती पिकाचे मोठे नुकसान झाले आहे.

या भागात शेतीसोबतच मोठ्या प्रमाणावर वीटभट्टी व्यवसाय चालतो, मात्र अवकाळी पाऊस आणि गारपिटीमुळे कच्च्या विटांचे पाणी झाले असून, वीट व्यावसायिकांचे लाखो रुपयांचे नुकसान झाले आहे. हवामान खात्याने पुढील २-३ दिवस पुन्हा अशाच पावसाचा अंदाज वर्तवल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण आहे. या पार्श्वभूमीवर, नुकसानग्रस्त भागाचे त्वरित पंचनामे करून बाधितांना तातडीने आर्थिक मदत देण्याची मागणी जोर धरत आहे. ज्यांची घरे पडली आहेत त्यांना नवीन घरे बांधून द्यावीत आणि पिकांच्या नुकसानीची भरपाई थेट शेतकऱ्यांच्या खात्यावर जमा करावी, अशी आर्त हाक ग्रामस्थांनी प्रशासनाकडे केली आहे.

हवामान खात्याने पुढील २-३ दिवस पुन्हा अशाच पावसाचा अंदाज वर्तवल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण आहे. या पार्श्वभूमीवर, नुकसानग्रस्त भागाचे त्वरित पंचनामे करून बाधितांना आर्थिक मदत देण्याची मागणी जोर धरत आहे. ज्यांची घरे पडली आहेत त्यांना नवीन घरे बांधून द्यावीत आणि पिकांच्या नुकसानीची भरपाई थेट शेतकऱ्यांच्या खात्यावर जमा करावी, अशी आर्त हाक ग्रामस्थांनी सरकारला दिली आहे.

**प्रशासनाने आता कागदी घोडे नाचऊ नका!**

● निसर्गाच्या लहरीपणाने शेतकरी पुरता उद्ध्वस्त झाला आहे. हाताशी आलेला कांदा, फळबागा आणि राहती घरेही गारपिटीने हिरावून नेली आहेत. प्रशासनाने आता केवळ कागदी घोडे न नाचवता, तातडीने या भागाचे पंचनामे करून थेट आर्थिक मदत द्यावी, हीच आमची मागणी आहे; अन्यथा बळीराजा पूर्णपणे कोलमडून पडेल. अशी मागणीच माजी चेअरमन दिलीप पाटोळे यांनी केली आहे.

## वाशी पामबीच वरुन सायन- पनवेल हायवेला जाणाऱ्या आर्म उड्डाणपूलाचे लोकार्पण

**अक्षराज : जे. के. पोळ**

**दि.०२, नवी मुंबई :** महानगरपालिकेच्या वतीने वाशी सेक्टर १७ येथे पामबीच मार्गावरुन पुण्याकडे जाण्याकरिता सायन पनवेल महामार्गापर्यंत उड्डाणपूल आर्मचा लोकार्पण समारंभ महाराष्ट्र राज्याचे वनमंत्री गणेश नाईक यांच्या शुभहस्ते संपन्न झाला. याप्रसंगी नवी मुंबईच्या महापौर सुजाता पाटील, उपमहापौर दशरथ भगत, 'ड' प्रभाग समितीचे सभापती प्रकाश मोरे, आरोग्य समिती सभापती डॉ.जयाजी नाथ, पाणीपुरवठा व मलनि:स्सारण समिती सभापती रविकांत पाटील, क्रीडा व सांस्कृतिक कार्यक्रम समिती सभापती गिरीश म्हात्रे, नगरसेवक शशिकांत राऊत, शशिकांत भोईर, सुरज पाटील, निशांत भगत, संदिप म्हात्रे, भरत नखाते, उपआयुक्त सोमनाथ पोटरे, सहा.आयुक्त तथा विभाग अधिकारी सुखदेव येडवे व सागर मोरे आणि इतर मान्यवर उपस्थित होते.



याप्रसंगी प्रसार माध्यमांशी बोलतांना वनमंत्री गणेश नाईक यांनी नवी मुंबईतून पामबीच रस्त्यावरुन पुण्याकडे जाण्यासाठी बनविण्यात आलेला जोडरस्ता हा अत्यंत उपयोगी असल्याचे सांगत ही कल्पना ज्यांना सूचली व ज्यांनी अंमलात आणली त्या घटकांचे कौतुक केले. नवी मुंबई शहराच्या रचनेमधील त्रुटी दूर करणारा हा प्रकल्प असल्याचे सांगत शहर अंतर्बाह्य सुंदर दिसण्यासाठी यापुढील काळात काम केले जाईल असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

यावेळी आर्म उड्डाणपूलावरून पहिला प्रवास दिव्यांग व्यक्तींसाठी असलेल्या दुचाकी वाहनाद्वारे वैभव ठाकूर यांनी केला. मंत्रीमहोदयांच्या शुभहस्ते त्यांना पुष्पगुच्छ देऊन सन्मानीत करण्यात आले. याप्रसंगी शहर अभियंता शिरीष आरदवाड यांच्या नियंत्रणाखाली कार्यरत आर्म उड्डाणपूल बांधकामाशी संबधीत कार्यकारी अभियंता पंढरीनाथ चौडे, उपअभियंता अमित पावरा, कनिष्ठ अभियंता रोहित पिंपळे तसेच वास्तुविशारद व कंत्राटदार यांच्या प्रतिनिधींचाही सन्मान करण्यात आला.

पामबीच मार्गावरुन सायन पनवेल महामार्ग पर्यंत जाण्यासाठी सेक्टर १७, वाशी येथे १८ कोटी ३२ लक्ष रक्कम खर्च करुन २९० मी. लांबीचा व ६.५० मी. रुंदीचा आर्म उड्डाणपूल बांधण्यात आला असून यामुळे वाशी पामबीच सिटी बँक जवळील चौकातून थेट सायन पनवेल महामार्गावर जाणे सोपे होणार आहे. सध्या पामबीच मार्गावरुन सायन पनवेल महामार्गावर जाण्यासाठी सानपाडा येथून मोठा वळसा घालून जावे लागत असून या आर्म उड्डाणपूलामुळे नागरिकांचा १० ते १५ मिनिटांचा वेळ वाचून इंधनाचीही बचत होणार आहे. त्यामुळे नवी मुंबईतील वाहतूकीच्या नियोजनासाठी ही मोठी उपलब्धी आहे.

## दरडगाव थडी येथे अवकाळी पावसाचा फटका; प्राजक्ततनपुरे यांची पाहणी



**अक्षराज : प्रमोद डफळ**

**दि.०२, राहुरी :** तालुक्यातील दरडगाव थडी परिसरात नुकत्याच झालेल्या अवकाळी पावसामुळे शेतकऱ्यांच्या पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. या पार्श्वभूमीवर माजी मंत्री प्राजक्त दादा तनपुरे यांनी आज प्रत्यक्ष शेतात जाऊन नुकसानग्रस्त पिकांची पाहणी केली. यावेळी त्यांनी शेतकऱ्यांशी संवाद साधत त्यांच्या अडचणी जाणून घेतल्या व शासनाकडून तात्काळ मदत मिळवून देण्याबाबत आश्वासन दिले.

दरडगाव थडी परिसरातील शेतकऱ्यांनी अवकाळी पावसामुळे उभ्या पिकांचे मोठे नुकसान झाल्याची व्यथा मांडली. काही ठिकाणी पिके आडवी पडली असून फळबागांनाही मोठा फटका बसल्याचे निदर्शनास आले. परिस्थितीची गंभीरता लक्षात घेता तनपुरे यांनी तात्काळ शासकीय अधिकाऱ्यांशी दूरध्वनीवर संपर्क साधून पंचनामे त्वरित पूर्ण करण्याच्या सूचना दिल्या. तसेच नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना शासनाकडून लवकरात लवकर आर्थिक मदत मिळावी यासाठी प्रशासनाने संवेदनशीलतेने काम करावे, असेही त्यांनी स्पष्ट केले.

यावेळी दरडगाव थडी येथील ज्येष्ठ कार्यकर्ते गंगाधर पाटील, जाधव बापूसाहेब रोकडे, अण्णासाहेब रोकडे, आप्पासाहेब रोकडे, भाऊसाहेब जाधव, भारत रोकडे, नवनाथ रोकडे, उत्तम बर्डे, दादा जाधव, गणेश जाधव, दत्तात्रय हार्दिक, सुरेश हारदे, रमेश अर्धे, अर्जुन जाधव, मंगेश दोंदे, राजेंद्र वाबळे, विशाल हारदे, दीपक जाधव, दारकु रोकडे, दत्तात्रय रोकडे आदींसह अनेक शेतकरी उपस्थित होते. शेतकऱ्यांच्या नुकसानीची दखल घेऊन तातडीने उपाययोजना केल्यास त्यांच्या आर्थिक संकटात काही प्रमाणात दिलासा मिळेल, अशी अपेक्षा स्थानिकांनी व्यक्त केली.

## नंदेश्वर भागात अवकाळीचा फटका बेदाणा शेडचे प्रचंड नुकसान

**अक्षराज : विकास सरवळे**

**दि.०२, पंढरपूर :** मंगळवेढा तालुक्यातील नंदेश्वर परिसरात झालेल्या अवकाळी पावसामुळे शेतकरी व नागरिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. अचानक झालेल्या पावसाने द्राक्ष उत्पादनासाठी उभारण्यात आलेल्या बेदाणे शेडचे मोठे नुकसान झाले असून, शेतकऱ्यांचे आर्थिक गणित पूर्णपणे कोलमडले आहे. याचदरम्यान नंदेश्वर येथील शेतकरी धोंडीराम गरंडे यांची गाय वीज पडून मृत्यूमुखी पडल्याची दुर्दैवी घटना घडली आहे.

घटनेची माहिती मिळताच आमदार समाधान आवताडे यांनी तात्काळ घटनास्थळी भेट देऊन नुकसानग्रस्त भागाची पाहणी केली. त्यांनी प्रत्यक्ष शेतकऱ्यांशी संवाद साधत त्यांच्या अडचणी जाणून घेतल्या.

यावेळी प्रांत अधिकारी बि.आर.माळी, तहसीलदार मदन जाधव, तालुका कृषी अधिकारी मनिषा मिसाळ, पंचायत समिती सभापती दिपाली ताड, जिल्हा परिषद सदस्य प्रदीप खांडेकर, उपनगराध्यक्ष येताळा भगत, पंचायत समिती सदस्य आप्पासाहेब निकम,मंडल कृषी अधिकारी बालाजी टेकाळे, कृषी पर्यवेक्षक ढाने, सहाय्यक दिपक कोकरे, तलाठी महेश राऊत, पशुधन विकास अधिकारी कुंभार, माजी नामदेव जानकर, दादासाहेब दोलतडे, अशोक चौंडे, भारत गरंडे, दामाजी बंडगर, राहुल कसबे, ज्ञानेश्वर गरंडे, जयसिंग कांबळे, दत्ता साबणे, नानासाहेब बंडगर, मायाप्पा गरंडे, आण्णासाहेब बंडगर, आण्णासाहेब पाटील, सिद्धेश्वर डांगे तसेच स्थानिक पदाधिकारी उपस्थित होते.



यावेळी आमदार समाधान आवताडे म्हणाले, नंदेश्वर परिसरात झालेल्या अवकाळी पावसामुळे शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले आहे. शासनाच्या माध्यमातून बाधित शेतकऱ्यांना तात्काळ मदत मिळवून देण्यासाठी मी स्वतः पाठपुरावा करणार आहे. प्रशासनाने पंचनामे जलद गतीने पूर्ण करून एकही शेतकरी मदतीपासून वंचित राहणार नाही याची दक्षता घ्यावी.

आमदार आवताडे यांनी प्रशासनाला तातडीने हालचाल करण्याचे आदेश देत, नुकसानग्रस्त पिकांचे, घरांचे तसेच मृत जनावरांचे पंचनामे त्वरित पूर्ण करण्याच्या सूचना दिल्या. तसेच पंढरपूर–मंगळवेढा विधानसभा मतदारसंघातील सर्व बाधितांना शक्य तितक्या लवकर आर्थिक मदत मिळवून देण्याबाबत संबंधित अधिकाऱ्यांना स्पष्ट निर्देश दिले.

या अवकाळी पावसामुळे शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणावर आर्थिक नुकसान झाले असून, शासनाने तात्काळ मदत जाहीर करावी अशी मागणी स्थानिक शेतकरी व नागरिकांकडून होत आहे.




## मुलांच्या सोशल मिडिया वापरावर बंदी घाला

सोशल मीडिया हा आज परवलीचा शब्द झाला आहे. आजचे युगच सोशल मीडियाचे युग आहे असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही. कारण आज सोशल मीडिया ही जीवनावश्यक गरज बनली आहे. लहानांपासून थोरांपर्यंत सर्वच जण सोशल मीडियावर सक्रिय आहेत. आज प्रत्येकाच्या हातात स्मार्ट फोन आहे आणि या स्मार्ट फोन मध्ये व्हॉट्सअप, फेसबुक, ट्विटर, इंस्टाग्राम, शेअर चाट, स्नॅप चाट, यु ट्यूब अशा अनेक सोशल मीडियावर साईट आहेत. या सोशल मीडिया साईटवर सतत सक्रिय राहून आपण किती सोशल आहोत हे दाखवण्यासाठी जो तो धडपडत असतो. विशेषतः किशोवयीन आणि तरुण मुलांमध्ये या सोशल मीडिया साईटची भलतीच भुरळ आहे. आजची युवा पिढी आपला सर्वाधिक वेळ सोशल मीडियावरच व्यतीत करते. एका सर्व्हेक्षणानुसार आपल्या देशातील मुले दररोज सरासरी पाच तास सोशल मीडियावर व्यतीत करतात. याचाच अर्थ आपली मुले सोशल मीडियाच्या आहारी गेली आहेत. ही मुले दिवसभर उपाशी राहू शकतील पण सोशल मीडिया पासून दूर राहू शकणार नाही. विशेष म्हणजे केवळ तरुण मुलेच नाही तर शाळकरी मुले देखील सोशल मीडियाच्या आहारी गेली आहेत. तंत्रज्ञानाचे जितके फायदे आहेत तितकेच तोटेही आहेत. तज्ज्ञांनी अनेकवेळा इशारा देऊनही त्याचा वापर कमी झालेला नाही उलट वाढतच चालला आहे. सोशल मीडियामुळे तर त्याच्या वापर उच्चांकी पातळीवर पोहचला आहे. त्याचे दुष्परिणामही समोर येत आहेत. सोशल मीडियाचा अती वापरामुळे मुलांच्या मानसिक आरोग्यावर परिणाम होत आहे. सोशल मीडियामुळे मुले हिंसक बनू लागले आहेत. सोशल मीडियामुळे मुलांमधील तणाव वाढला आहे. मुलांना डोळ्यांच्या तक्रारी जाणवू लागल्या आहेत अनेक मुलांना लहान वयातच चष्मा लागल आहे. सोशल मीडियामुळे मुले मैदानी खेळ विसरले आहेत. सोशल मीडियामुळे मुलांमधील संवाद हरपला आहे. मुले एकलकोंडी बनली आहे. सर्वात महत्वाचे म्हणजे सोशल मीडियामुळे मुलांच्या अभ्यासावर परिणाम होऊ लागला आहे. मुलांची एकाग्रता भंग झाली आहे. मुले चीडचीडी बनली आहेत म्हणून किमान शाळकरी मुलांना तरी सोशल मीडिया पासून दूर ठेवावे असे तज्ज्ञ सांगत आहेत त्यामुळे अनेक शाळांनी मुलांना शाळेत मोबाईल वापरण्यास बंदी घातली आहे मात्र शाळा सुटल्यावर मुले सोशल मीडियाचा वापर करतातच म्हणून मुलांच्या सोशल मीडिया वापरावर कायद्यानेच बंदी आणावी अशी मागणी होऊ लागली आहे. भारत सरकारने अजून तरी शाळकरी मुलांच्या सोशल मीडिया वापरावर बंदी आली नसली तरी कर्नाटक सरकारने मात्र या संदर्भात सकारात्मक पाऊल टाकत १६ वर्षाखालील मुलांच्या सोशल मिडिया वापरावर बंदीचा प्रस्ताव मांडला आहे. लहान मुले सोशल मीडियाच्या आहारी जाऊ नयेत, तसेच लहान मुलांची ऑनलाईन सुरक्षा आणि वाढत्या स्क्रीन टाईम पासून मुलांना वाचवण्यासाठी कर्नाटक सरकारने हा निर्णय घेतला आहे. अशाप्रकारे बंदीचा प्रस्ताव आणणारं कर्नाटक हे देशातील पहिले राज्य बनले आहे. कर्नाटक सरकारचे याबाबत जितके कौतुक करावे तितके कमी आहे. कर्नाटक सरकारचा हा अनुकरणीय आहे. कर्नाटक सरकारच्या या निर्णयाचे आंध्रप्रदेश आणि गोवा सरकारनेही अनुकरण करण्याचे ठरवले असून हे राज्यही लवकरच लहान मुलांच्या सोशल मिडिया वापरावर बंदी घालणार आहेत. आपल्या देशात लहान मुलांच्या सोशल मीडिया वापरावर बंदी घालण्यासंदर्भात आता पावले उचलली जात आहेत मात्र जगातील अनेक देशात याआधीच लहान मुलांच्या सोशल मीडिया वापरावर बंदी घातली गेली आहे. दोन वर्षापूर्वी अमेरिकेतील फ्लोरिडा प्रांताने शाळकरी मुलांच्या सोशल मीडिया वापरावर बंदी घातली. त्यांनी तसा कायदाच केला आहे. फ्लोरिडा प्रांताचे गव्हर्नर रॉन डी सेंटीस यांनी तसा कायदाच मंजूर करून घेतला. ऑस्ट्रेलियातही १६ वर्षाखालील मुलांना सोशल मिडीयाचा वापर करण्यास बंदी घातली आहे. आता भारतातही त्या संदर्भात पावले उचलली जात आहे ही सकारात्मक बाब आहे मात्र प्रत्येक राज्यसरकारने आपल्या राज्यपुरता असा निर्णय घेण्याऐवजी जर केंद्र सरकारनेच संसदेत तसा कायदा केला तर तो संपूर्ण देशात एकाच वेळी ही बंदी लागू होईल. त्यामुळे केंद्र सरकारलाच विनंती आहे की त्यांनी संसदेत तसा कायदा करावा अर्थात कायद्यानेच मुलांचे सोशल मिडियाचे व्यसन सुटेल असे नाही तर कायद्याला प्रबोधनाचीही जोड द्यावी लागेल. कायद्यासोबत मुलांचे प्रबोधन केले, मुलांना सोशल मिडियाचे दुष्परिणाम समजावून सांगितले त्यासाठी शाळेत चर्चा सत्र आयोजित केली तर मुलांचे सोशल मिडियाचे व्यसन सुटण्यास नक्कीच मदत होईल. कायद्याने असोत की प्रबोधनाने मुलांचे मुलांचे सोशल मिडियाचे व्यसन सुटणे महत्वाचे आहे.

**- श्याम ठाणेदार**

# वाचाळवीरांना वेळीच आवर घालण्याची गरज...?

जैन समाज आणि जैन धर्म शांतताप्रिय मानला जातो. २०११ पासून देशाची जनगणना झाली नसली तरी भारतात जैन धर्मीयांची संख्या ५० लाख म्हणजे एकूण लोकसंख्येच्या. ३७ असल्याचे सांगितले जाते. मात्र, व्यापारउदिमामध्ये, श्रीमंत व्यक्तींमध्ये जैनांना प्रामुख्याने उल्लेख होतो. मात्र, काही वर्षांपासून महाराष्ट्रात खास करून मुंबईत जैन समाजाकडून वादग्रस्त वक्तव्ये केली जात आहेत. किंबहुना मराठी समाज आणि जैन यांच्यात वाद निर्माण करण्याचा प्रयत्न केला जात आहे. त्यात जैन मुनी आघाडीवर आहेत. अलीकडच्या काळात जैन मुनींच्या चमत्काराच्या गोष्टीही रंगू लागल्या आहेत. यात मंत्रीदेखील सहभागी होत असल्याने वाद निर्माण करून जैनांचे महत्त्व उगाचच वाढवण्याचा प्रयत्न केला जात आहे का, असा संशय निर्माण होत आहे. मुंबईत सर्व समाजाचे लोक आनंदाने राहात आहेत. मात्र, दशकभरापासून वेगवेगळ्या निमित्ताने मराठीजनांना कमी लेखण्याचे नियोजनबद्ध प्रकार सुरू झाले आहेत. या आधी अनेक सोसायट्यांमधील काही जैन, गुजराती तसेच मारवाडी कुटुंबे मांसाहार करणाऱ्या मराठी माणसांना घरे नाकारल्याच्या तक्रारी येत होत्या. पुढे मराठी माणसांचा अपमान करण्यापर्यंत त्यांची मजल गेली होती.आतातर यावर कळस चढवला आहे.

महाराणी ताराबाई यांचे चक्क धर्मातर करण्याची हिंमत जैन मुनींनी दाखवली आहे. आचार्य नयन पद्मसागर यांनी महावीर जयंतीच्या दिवशी महाराणी ताराराणी जैन समाजाच्या होत्या, असे त्वेषाने वक्तव्य करून नवीन वादाला जन्म दिला आहे. एवढेच नाही तर मराठी भाषेची रचना जैन आचार्यांनी केली, असाही दावा त्यांनी केला. हे म्हणजे तोंडात आलं म्हणून बरळले, असे झाले आहे. आचार्य नयन पद्मसागर यांच्याकडे महाराणी ताराबाई जैन असल्याचे काही पुरावे असल्यास त्यांनी ते सादर करण्याची गरज होती.

कारण हा विषय मराठा साम्राज्याच्या इतिहासाशी जोडलेला आहे. जैन प्रस्थाचे आणखी एक उदाहरण म्हणजे मंत्री मंगल प्रभात लोढा यांनी जैन मंदिरांना गॅस सिलिंडर देण्याची शिफारस अन्न व नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळांकडे केली आहे. यावरून मंत्री एका समाजाचे कसे असू शकतात आणि केवळ जैन मंदिरांनाच गॅसटंचाईच्या काळात सिलिंडर का द्यायचे, असा प्रश्न उपस्थित झाला. त्यानंतर त्यांनी सारवासारव करत सर्वधर्मियांच्या मंदिरांना गॅस सिलिंडर द्यावेत, अशी भूमिका घेतली. त्यानंतर अवघ्या दोन दिवसांत मंत्री लोढा यांनी, जैन मुनींना भेटल्यानंतर रितू तावडे मुंबईच्या महापौर झाल्या, असे वक्तव्य कैले. या आधीही त्या जैन मुनींना भेटल्यानंतर नगरसेविका झाल्या होत्या असे म्हटले. लोढा यांचे हे वक्तव्य दुर्लक्ष करण्यासारखे नाही. कारण महापौर रितू तावडे यांनीही अशाच प्रकारचे वक्तव्य केले आहे. त्यांनी थेट अंधश्रद्धेला खतपाणी घातले. त्यांचा




घसा दीड वर्षे खराब होता, अनेक औषधे घेतली मात्र जैन मुनींनी माझ्यासाठी प्रार्थना केल्यानंतर चमत्कार झाला आणि घसा बरा झाला, असा जाहीर दावा महापौर रितू तावडे यांनी केला आहे. आधीच भोंदूबाबांच्या प्रकरणामुळे महाराष्ट्र ढवळून निघत आहे. आहे. अशा अशातच मुंबईच्या प्रथम नागरिक असलेल्या महापौर रितू तावडे यांनी जैन मुनींचे नाव घेतल्यावर चमत्कार झाला आणि घसा बरा झाला, असा दावा केला आहे. मुंबई महापालिकेची निवडणूक होण्यापूर्वी ५-६ महिने अगोदर मुंबईत कबुतरखान्याचा वाद चिघळला होता.

कबुतरांचा उपद्रव आणि त्यामुळे होणारे आजार याकडे दुर्लक्ष करत त्यावेळी जैन मुनींनी अनेक वादग्रस्त वक्तव्ये केली होती. अगदी वेगळा राजकीय पक्ष स्थापन करण्याची भाषादेखील केली होती. पण निवडणूक संपली आणि कबुतरांचा विषय कुठे गेला हे कुणालाच कळले नाही. म्हणजेच सगळे सोयीनुसार चालले आहे आणि एका समाजासाठी सर्वांना वेठीस धरले जात आहे, हे दिसू लागले आहे. आणखी एक वाचाळवीर म्हणजे गांधीद्वेषाने पछाडलेले अभिनेते शरद पोंक्षे. आपण 'नथुराम गोडसे' मय झालो आहोत, हे पोंक्षे यांनी त्यांच्या वक्तव्यातून अनेकदा दाखवून दिले आहे. मात्र, यावेळी त्यांनी थेट भारतरत्न आणि भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यावरच बोट दाखवले आहे. 'भारत एक हिंदू राष्ट्र' या विषयावर नागपुरातील रेशीमबाग परिसरात बोलताना पोंक्षे यांनी 'मनुस्मृती जाळणाऱ्यांनी ती वाचली तर ते जाळू शकले नसते' असे धाडसी विधान करून खळबळ उडवून दिली आहे. डॉ. आंबेडकर यांनी २५ डिसेंबर १९२७ रोजी महाडमध्ये मनुस्मृतीचे दहन केले. मनुस्मृतीत चातुर्वर्णाचा पुरस्कार, अस्पृश्यता वाढवणारे, स्त्रियांना कमी लेखणारे, विषमतावादी विचार असल्याने बाबासाहेबांनी मनुस्मृती जाळली. तत्पूर्वी बाबासाहेबांनी २० मार्च १९२७ रोजी महाडमध्ये ऐतिहासिक चवदार तळे सत्याग्रह करून ते पाणी सर्वांसाठी खुले केले. ही मोठी सामाजिक क्रांती मानली जाते. मात्र, शरद पोंक्षे त्यांनी

गांधीद्वेषाप्रमाणेच आंबेडकरद्वेष किती आहे, हे दाखवून दिले आहे. तत्कालीन राज्यपाल भगतसिंग कोश्यारी यांनी जोतिबा फुले, शिवछत्रपती यांच्याबद्दलही विक्षिप्त उद्गार काढले होते. थोडक्यात महाराष्ट्रातील वीर आणि महापुरुषांना बदनाम करण्याची समांतर चळवळ सुरू झाली आहे. म्हणूनच उचलली जीभ लावली टाळ्याला, या सदरात मोडणाऱ्या, अशा वाचाळवीरांना वेळीच आवर घालण्याची गरज आहे.

# तुकाराम मुंडे- बदली, बदली आणि फक्त बदली...

तुकाराम मुंडे आणि बदली हे जणु समिकरणच बनले आहे. एक कर्तव्य निष्ठ, कडक शिस्तीचे अधिकारी आणि भ्रष्टाचारापासुन कोसो दुर असलेले अधिकारी ही मुंडे यांची ओळख, मात्र आजच्या व्यवस्थेला असे अधिकारी 'नकोसे' असतात त्यामुळेच मुंडे यांची एकवीस वर्षातील ही चोवीसावी बदली झाली मुंडे यांना एखाद्या पदावर किमान तीन वर्षाचा कालावधी देखील पुर्ण करु दिला जात नाही कि काम करु दिले जात नाही याचे नेमके कारण काय असावे?. अत्यंत सामान्य कुटुंबातील तुकाराम मुंडे यांनी मेहनतीने प्रशासकीय सेवेत २००५ मधे पहिल्यांदा सोलापूर येथे प्रशिक्षणार्थी ऊप जिल्हाधिकारी म्हणून त्यांनी कामाची सुरुवात केल, २००७ मधे



त्यांना देगलूर येथे पाठविण्यात आले पुढे २००८ नागपुर जिल्हा परिषद मुख्याधिकारी, लगेच २००९ मधे अदिवासी ऊपायुक्त, त्याच वर्षी मुख्याधिकारी वाशिम, २०१० मधे सीईओ म्हणून कल्याण, २०११ मधे जिल्हाधिकारी जालना, २०१२ मधे विक्रीकर आयुक्त मुंबई, २०१४ मधे सोलापूर जिल्हाधिकारी, २०१६ मधे नवी मुंबई महापालिका आयुक्त, २०१७ मध्ये पीएमपीएल पुणे सीईओ, २०१८ मधे नाशिक महानगरपालिका आयुक्त, त्याच वर्षी सहसचिव नियोजन, पुन्हा २०१८ मधेच प्रकल्प अधिकारी एड्स नियंत्रण, २०२० मधे नागपूर महापालिका आयुक्त, त्याच वर्षात महाराष्ट्र जीवन प्राधिकरणात सदस्य सचिव, २०२१ मधे राष्ट्रीय मानवाधिकार आयोग, २०२२ मधे आयुक्त आरोग्य सेवा आणि संचालक राष्ट्रीय आरोग्य अभियान २०२३ मधे सचिव दुग्ध विकास व पशुसंवर्धन, सचिव मराठी भाषा विभाग, सचिव कृषी व पशुसंवर्धन, २०२४ मधे असंघिटत कामगार विभाग, २०२५ मधे दिव्यांग कल्याण विभाग, आणि आता आपत्ती व्यवस्थापन व महसुल, वन विभाग असा प्रशासकीय प्रवास सर्व पक्षीय राज्यकर्त्यांनी त्यांना घडवला आहे. जी जबाबदारी त्यांच्यावर टाकण्यात आली ती प्रामाणिकपणे ते पार पाडतात हे अनेकदा अधोरेखित झाले आहे त्यामुळेच सामान्य जनतेला ते भावतात. मात्र वारंवार बदल्या करुन राज्यकर्ते नेमके काय साध्य करतात हे अनाकलनीय आहे. एखाद्या प्रामाणिक अधिकाऱ्याला प्रोत्साहन मिळण्याऐवजी त्याचे खच्चीकरण केले जात आहे का?.

अनेक भ्रष्ट अधिकारी वर्षानुवर्षे एकाच पदावर एकाच ठिकाणी ठेवले जातात क्रीम पोस्टिंग साठी लाखो करोडो रुपयांचा व्यवहार होतो. आपल्या मर्जीतील अधिकारी असावा यासाठी अनेक राजकीय नेते विशेषतः सत्ताधारी पक्ष आग्रही असतो, आणि आणुन बसवला जातो तो कशासाठी हे 'ये पब्लिक है ये सब जानती है'. अनेकांचे खाजगी विशेष अधिकारी असतात, हे 'ओएसडी 'नेमके कुठले विशेष कार्य करतात हा प्रश्नच आहे. नोकरीत असतांना हे अधिकारी राजकिय नेत्यांची मर्जीराखुन काम करतात आणि सेवानिवृत्ती नंतर राजकारणी मंडळी यांची विशेष सोय करतात असा सगळा आतबट्ट्याचा व्यवहार चालतो. या व्यवस्थेत तुकाराम मुंडे बसत नाही यामुळेच त्यांची वारंवार बदली केली जाते. राजकिय व्यवस्थेला जरी असे कर्तव्यनिष्ठ, प्रामाणिक अधिकारी नकोसे झाले असले तरी सर्व सामान्य जनता अशाच अधिकाऱ्यांचा मान राखते, आदराने पहाते. प्रशासकीय अधिकाऱ्यांमध्ये अत्यंत सचोटीने, प्रामाणिकपणे,नियमानुसार, जनतेच्या प्रती उत्तरदायित्व असल्याची जाणीव ठेवून काम करणारे देखील अनेक अधिकारी आहेत, आजवर होऊन गेले आहेत हरियाणा मधील अशोक खेमका, किरण बेदी, आपल्या राज्यातील महेश झगडे, अविनाश धर्माधिकारी, गो. रा खैरनार, अरूण भाटिया आणि आता ज्यांची नोकरीत कोंडी केली जात असलेले श्री. तुकाराम मूंडे असे अधिकाऱ्यांनी आपले कर्तव्य पार पाडत जनतेच्या मनात आदर निर्माण केला आहे. मात्र अशा लोकांचीच कोंडी केली जाते आणि त्यांचेच खच्चीकरण करण्याचा प्रयत्न केला जातो हे अधिक दुर्दैवी आहे. श्री. तुकाराम मुंडे हे जिकडे जातील तिकडे आपल्या कार्याची छाप पाडतात, सामान्य जनता त्यांना दाद देते, मात्र तरीही सर्व पक्षीय राजकीय नेत्यांना ते का नकोस वाटतात हे फारच खेदजनक आहे.हरियाणाचे अशोक खेमका यांच्या पस्तीस वर्षाच्या सेवाकाळात तब्बल चोपन्न वेळा बदली केली गेली.खरतंर मुंडे यांच्या सारख्या अधिकाऱ्यांना प्रोत्साहन दिले पाहिजे मात्र त्यांचे खच्चीकरण करण्याचा प्रयत्न कायमच केला जातो कारण आजच्या व्यवस्थेत ते 'वेगळे' ठरतात. काही भ्रष्ट राजकारणी, वरिष्ठ नोकरशहां, शासन-प्रशासनातील झारीतील शुक्राचार्य, कंत्राटदार, दलाल यांच्या भ्रष्ट युतीने सर्वच व्यवस्था भ्रष्टाचाराने बरबटलेल्या आहेत आणि अशांची चलती आहे.

कमिशन, दलाली, टक्केवारी यांनी सर्व व्यवस्था भ्रष्ट झालेल्या आहेत, टेबलाखालुन, चिरीमिरी पासुन सुरु झालेला भ्रष्टाचार आता ऊघडपणे करोडो रुपयांचा होऊ लागला आहे, ना कोणाला कायद्याचा धाक ना शिक्षेची भिती, कारण आपण सगळे भाऊ भाऊ मिळून सारे लुटून खाऊ अशीच परिस्थिती जिकडेतिकडे दिसते आहे. जो तो आपापल्या पदाचा अधिकाराचा सदुपयोगापेक्षा दुरुपयोगच करत आहे आणि संधीचे सोने करून घेत आहे हे त्यांची मालमत्ता ज्या पद्धतीने वाढते त्यावरुन दिसते. अशा भ्रष्ट व्यवस्थेत मुंडे बसत नाही हा त्यांचा दोष त्यामुळेच त्यांना बदलीची शिक्षा दिली जाते. असे प्रामाणिक अधिकारी कोणालाच नको असतात हे वारंवार अधोरेखित होत आहे.

**- अनंत बोरसे**
**शहापूर जिल्हा ठाणे.**
**९१५८४९५०३७**

## रामनाम सत्य

रामनाम सत्य आहे
अंत्ययात्रेत म्हणता
कळेसत्य जीवनाचे
अंत यात्रेची ऋणता

चार खांद्यावर कधी
आपली असे नेणता
नश्वर अमोल आयुष
आजउगाचं क्हणता

पहात नाही कधीही
माझ्यातकाय उणता
जिवंत माणूस विसरे
पापीकलेवर खणता

हतबलअसे सदोदित
आव मिथ्या आणता
कठपुतळी आहोत रे
कृशता सारी जाणता

तपासून पाहे स्वतांत
कळावीकाय क्षिणता
गळून जाणार हातूनि
कितीकशास शिणता

पुण्य मोजून मापून रे
चुका कधी हो गणता
कुणावरकेले उपकार
चुकून शून्याने गुणता


जीवंतपणाचे दाखले
अंगात जोवर उष्णता
सोडून जाता प्राण तो
कलेवारात वितृष्णता

**- हेमंत मुसरीफ, पुणे.**
**९७३०३०६९९६**

# मानपानांवरुन पालखी सोहळ्यातील वादंगाचे प्रकार धोकादायक

आगरी - कोळी आणि चांद्रसेनीय कायस्थ प्रभू अर्थात सीकेपी यांचे श्रद्धास्थान असणाऱ्या पुणे जिल्ह्यातील लोणावळा - कार्ला येथील एकवीरा देवीच्या यंदाच्या पालखी सोहळ्यादरम्यान कल्याण व पनवेल येथील भक्तांमध्ये मानाच्या प्रश्नावरुन वाद होवून दंगल भडकली दुकाने, स्टॉल्स यांची जाळपोळ झाली मोठ्या प्रमाणात नुकसान झाले एकमेकावर हल्ले झाले, दगडफेक झाला अनेकांची डोकी फुटली या सर्व घटनेच्या ध्वनीचित्रफिती समाजमाध्यमांवर फिरत आहेत.

त्यामुळे देवाच्या दारात असा वादंग होणे निंदनीय प्रकार आहे. धार्मिक सोहळ्यात मानपानांवरुन घटना घडत असतील तर त्या समाजाला नक्की मारक ठरणारं आहेत कोणत्याही प्रकारचा मनात भेदभाव न ठेवता प्रामाणिक आणि लोभी न होता देवावर श्रद्धा ठेवून कार्य करणे निश्चितच स्वागतार्ह आहे.



एखाद्या समाजविघातक प्रकारामुळे संपुर्ण समाजाला वेठीस धरणे, नुकसान करणे हे गुन्हेगारीचेचं लक्षण आहे अशा घटनेमुळे स्थानिक जनतेत, भक्तांमध्ये तीव्र नाराजी पसरली आहे असे वादंगांचे प्रकार यापूर्वीही घडल्याचे समोर आले आहे देवदर्शन, आशीर्वाद, आपले गाऱ्हाणे मांडायला आलेल्या भक्तांमध्ये आपापसात मारामाऱ्या होणे यामुळे देवी प्रसन्न तर होणारं नाही. मात्र कोपण्याची शक्यता नाकारता येत नाही.

**- राजू जाधव,**
**मांगूर जि. बेळगांव**

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायलयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

# थोडक्यात

## अवकाळी पावसाचा तडाखा; कांदा, द्राक्ष, डाळिंब, गहू, मका पिकांचे मोठे नुकसान



**अक्षराज : सुनील क्षिरसागर**

**दि.०२, विंचूर (नाशिक) :** दिनांक ०२ एप्रिल २०२६ रोजी दुपारी अचानक आलेल्या अवकाळी पावसासह जोरदार वाऱ्याने निफाड तालुक्याच्या पूर्व भागातील शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले. सुमारे दीड तास सुरू असलेल्या या पावसासोबत काही ठिकाणी तुरळक गाराही पडल्याने कांदा, द्राक्ष, डाळिंब, गहू, मका या उभ्या पिकांना मोठा फटका बसला आहे. विशेषतः कांदा व द्राक्ष पिकांचे अधिक नुकसान झाले आहे. निफाड पूर्व भागातील देवगाव, कानळद, कोळगाव, वाकद, शिरवाडे, मानोरी, भरवस, विंचूर, वाहेगाव, नांदगाव, डोंगरगाव, धारणगाव, खेडलेझुंगे या गावांमध्ये जोरदार वाऱ्यामुळे द्राक्ष बागांचे नुकसान झाले असून अनेक ठिकाणी द्राक्षे घडांना फटका बसला आहे. डाळिंब बागांमध्ये फळगळ झाली असून कांदा पिकावर पावसाचे पाणी साचल्याने कुजण्याची भीती निर्माण झाली आहे. गहू व मका पिकांनाही पावसाचा मोठा फटका बसल्याने उत्पादन घटण्याची शक्यता व्यक्त होत आहे.सध्या शेती खर्च मोठ्या प्रमाणात वाढलेला असताना वारंवार येणाऱ्या नैसर्गिक आपत्तीमुळे शेतकरी आर्थिक संकटात सापडला आहे. शेतीत नवनवीन प्रयोग करणे म्हणजे कर्जाचा डोंगर उभा करण्यासारखे झाले असून अशा परिस्थितीत तरुण शेतकरी शेतीकडे पाठ फिरवतील, अशी भीती व्यक्त होत आहे. कांदा, द्राक्ष, डाळिंब, गहू, मका या पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असून शासनाने तातडीने पंचनामे करून शेतकऱ्यांना नुकसान भरपाई जाहीर करावी. सध्याच्या परिस्थितीत शेतकरी हवालदिल झाला असून त्वरित मदत मिळणे अत्यावश्यक आहे. महसूल व कृषी विभागाने तात्काळ पंचनामे करून बाधित शेतकऱ्यांना आर्थिक दिलासा द्यावा. अशी मागणी शेतकरी वर्गातून होत आहे. वारंवार होणाऱ्या अवकाळी पावसामुळे शेती व्यवसाय धोक्यात आला असून शासनाने ठोस उपाययोजना कराव्यात, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

## कॉन्ट्रॅक्टर असोसिएशन तर्फे मुख्य अभियंता विवेक रोकडे यांचे स्वागत




**अक्षराज : दिवाकर घेर**

**दि.०२, नागपूर :** खापरखेडा औष्णिक वीज केंद्राचे मुख्य अभियंता गिरीश कुमारवार यांची मुंबई येथे मुख्य कार्यालयात अतिरिक्त कार्यकारी संचालक (संचलन-१) पदी पदोन्नती झाल्याने त्यांच्या रिक्त जागी कोराडी प्रकल्पाचे विवेक रोकडे यांची खापरखेडा औष्णिक विद्युत केंद्राच्या मुख्य अभियंता पदी निवड करण्यात आली. मुख्य अभियंता विवेक रोकडे यांनी खापरखेडा औष्णिक विद्युत केंद्राचा पदभार सांभाळल्यानंतर खापरखेडा कॉन्ट्रॅक्टर्स असोसिएशनतर्फे संघटनेचे अध्यक्ष दिलीप बनसोड यांच्या हस्ते विवेक रोकडे यांचा शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले. यावेळी उपमुख्य अभियंता नितीन रोकडे, उपमुख्य अभियंता नारायण राठोड, कामगार कल्याण अधिकारी आनंद वाघमारे प्रामुख्याने उपस्थित होते.

याप्रसंगी कॉन्ट्रॅक्टर असोसिएशनचे महासचिव दिवाकर घेर, शांताराम गावंडे, शामराव सरोदे,अनिल भोयर, कुणाल भोस्कर, महेश अढाऊ, पुरुषोत्तम चांदेकर, रमेश लोणारे,अहफाझ अहमद, विनोद बरडे, दिलीप ढगे, गणेश लोणारे, राजेश खंडारे, रामचंद्र जोगे, राजू गभने, राजकुमार, परिहार, उत्तम गेडाम, राजेश गायकवाड, संतोष पाटील, केशव पानतावणे, राजीक पठाण, तुषार जेस्वानी, सुधीर फेन्डर, कबीर हुसेन, अशोक वासनिक, दिनेश काकडे, नागेश निकोसे, कैलास बर्वे, आदींची प्रामुख्याने उपस्थिती होती.

## साई मल्टिस्टेट पतसंस्थेला २ कोटी २५ लाख तर साई ग्रामीणला १ कोटी ७ लाख नफा



**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.०२, पारनेर (अहिल्यानगर) :** श्री साई मल्टिस्टेट पतसंस्थेला सन २०२५ - २०२६ या आर्थिक वर्षात रुपये २ कोटी २५ लाख तर श्री साई ग्रामीण पतसंस्थेला १ कोटी ७ लाख रुपयांचा ढोबळ नफा झाला आहे अशी माहिती संस्थेचे संस्थापक चेअरमन तथा माजी जिल्हा परिषद सदस्य वसंतराव चेडे यांनी दिली. श्री साई मल्टिस्टेट संस्थेच्या ठेवी मार्च २०२६ अखेर ३४ कोटी २५ लाख रुपयांच्या ठेवी आहेत. संस्थेचे वसुल भाग भांडवल १ कोटी ७ लाख असुन राखीव व इतर निधी ११ कोटी १ लाख आहे. संस्थेचे कर्ज वाटप ३८ कोटी ८ लाख असून बँक शिल्लक व गुंतवणूक रुपये ७ कोटी ३० लाख आहे. तर श्री साई ग्रामीण संस्थेच्या ठेवी मार्च २०२६ अखेर ३७ कोटी ६१ लाख रुपयांच्या ठेवी आहेत. संस्थेचे वसुल भाग भांडवल १ कोटी ४ लाख असुन राखीव व इतर निधी ६ कोटी ५७ लाख आहे. संस्थेचे कर्ज वाटप ३२ कोटी १९ लाख असून बँक शिल्लक व गुंतवणूक रुपये १३ कोटी ३४ लाख आहे. संस्थेने ११ वर्षाच्या कालावधीत सभासदांचा विश्वास संपादन केलेला आहे. सभासदांना आर्थिक प्रगती करता यावी यासाठी पतसंस्थेच्या माध्यमातून विविध प्रकारच्या ठेवी जमा करण्यात आलेले आहेत तसेच विविध प्रकारचे कर्ज वितरण करून आर्थिक विकास करण्याचा संस्थेने प्रयत्न केलेला आहे. संस्थेच्या ढवळपुरी, चिंचोली, कान्हुर पठार, शिरूर व आळकुटी येथे स्वमालकीच्या प्रशस्त व अद्यावत इमारती आहेत.

“संस्थेचे कार्यक्षेत्र महाराष्ट्र राज्य असून संस्थेमार्फत पारनेर, कान्हुर पठार, ढवळपुरी, आळकुटी या शाखांमध्ये सभासदांना लॉकर सुविधा उपलब्ध करण्यात आलेली आहे, संस्थेच्या माध्यमातून आरटीजीएस, चेक क्लिअरिंग, एस एम एस सुविधा उपलब्ध करण्यात आलेले आहेत.”

**- प्रशांत बढे (कार्यकारी संचालक श्री साई पतसंस्था पारनेर)**

# शिव आरोग्य योजना शेतकरी ग्रामस्थांसाठी संजीवनी ठरेल - आ.दाते



**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.०२, पारनेर (अहिल्यानगर) :** नगर तालुक्यातील जखणगाव हे आरोग्यदायी गाव म्हणून राज्यातच नाही तर देशात सुप्रसिद्ध आहे. या गावांमध्ये ग्रामपंचायत व प्राथमिक आरोग्य उपकेंद्र यांचे मार्फत गावातील अधिकृत हॉस्पिटल च्या सहकार्याने यंदाच्या नवीन आर्थिक वर्षापासून शिव आरोग्य योजना सुरू करण्यात आली आहे.

या प्रकल्पाचे उद्घाटन पारनेर नगर विधानसभा मतदारसंघाचे आमदार काशिनाथजी दाते यांच्या हस्ते नुकतेच करण्यात आले. जखणगाव मध्ये चालू असलेल्या अखंड हरिनाम सप्ताहाच्या कीर्तन सेवा पश्चात आमदार दातेंनी शिव आरोग्य योजना जखणगावकरांसाठी अधिकृतपणे सुरू झाल्याचे जाहीर केले. या योजनेमध्ये शेतकऱ्यांनी आपल्या शेतात पिकवलेले पाच पायल्या धान्य किंवा फळे, भाजीपाला वार्षिक देणगी म्हणून जमा केल्यावर त्यांना वर्षभर सर्व प्रकारच्या आरोग्यसेवा मोफत पुरवण्यात येतील.

या योजनेची प्रस्तावना करताना गावचे सरपंच डॉ.सुनील गंधे यांनी या योजनेमार्फत करण्यात येणाऱ्या तपासण्या, उपचार व औषधांचे नियोजन याबाबत सविस्तर माहिती सांगितली. गोळा झालेल्या या धान्याचा, भाजीपाला व फळांचा वापर या योजनेत सक्रिय सेवा देणाऱ्या सर्व डॉक्टर्स व आरोग्यदुतांच्या कुटुंबाना वितरित करून सेंद्रिय खाद्यपदार्थांच्या वापरानेकिमान त्यांच्या कुटुंबातील आरोग्य व्यवस्था सुदृढ होईल. मोबदल्यात आरोग्य सेवा गावातील परिवारांना पुरवताना सेवाभावी कार्य म्हणून त्यांच्या हातून धर्मकार्य व पुण्य कार्य घडेल. ज्याची खावी पोळी त्याची वाजवावी टाळी या म्हणीप्रमाणे रुग्ण व डॉक्टर्स यांचे नाते व्यावहारिक न राहता जिव्हाळ्याचे निर्माण होईल.

शेती व शेतीपूरक धंद्यावर अवलंबून असणाऱ्या सुमारे ७० टक्के ग्रामस्थांचा वार्षिक उत्पन्नाचा निम्मा भाग हा आरोग्य व्यवस्थेवर खर्च होतो. त्यामुळे त्याची उन्नती तर दूरच पण दरवर्षी तो कर्जाच्या खाईत अजून बुडून त्याची अधोगती होते. या योजनेअंतर्गत फक्त पाच पायल्या धान्यांमध्ये एका व्यक्तीचे एका वर्षासाठी संपूर्ण आरोग्य सुरक्षेची हमी मिळाल्याने या गावातील नागरिकांसाठी हा प्रकल्प संजीवनी ठरेल.

**- आमदार काशिनाथ दाते (विधानसभा सदस्य)**

---

पूर्वी गावात बलुतेदारी पद्धत होती त्याच धर्तीवर हा प्रकल्प राबविण्यात येत असल्याने शेतकऱ्यांचा आर्थिक लुटीपासून बचाव होईल. यात उपचारासाठी लागणारी औषधे ही आरोग्य उपकेंद्र व खाजगी रुग्णालयासाठी शासनाने सुरू केलेल्या आयुष्यमान भारत सारख्या विविध आरोग्य योजनांच्या माध्यमातून पुरवली जातील. तसेच औषध निर्माण कंपनीच्या माध्यमातून औषधाचा काही भाग डॉक्टरसाठी राखीव असणारा या योजनेमध्ये पूर्ण क्षमतेने वापरला जाईल. अगदी छोट्या छोट्या आजाराच्या उपचारापासून ते गंभीर आजाराच्या लागणाऱ्या शस्त्रक्रिया पर्यंत बाळंतपणापासून बायपास पर्यंत सर्व आरोग्य सेवा या योजनेत या गावातील सर्व सहभागी नागरिकांना संपूर्ण वर्षभर मोफत मिळणार आहेत.

**- डॉ.सुनील गंधे**

या कार्यक्रमास हरी भक्ती परायण योगेश महाराज शिंदे, उद्योजक बापूशेठ सोनवणे, ग्रामपंचायत सदस्य नवनाथ वाळके, देवस्थानचे अध्यक्ष भाऊसाहेब कर्डिले, नंदाताई बबन कर्डिले, बचत गट प्रतिनिधी श्रीम. रंजनाताई गंधे, माजी सरपंच बबनराव कर्डिले, मनोहर काळे, निलेश भिसे, राजू काका कर्डिले, सुभाषराव सौदागर, भीमराज सौदागर, गोवर्धन गुंड, गणेश वाळके यांचे सह असंख्य जनसमुदाय उपस्थित होता.

# विंचूरला अवकाळीचा सलग दुसऱ्या गुरुवारी तडाखा

## आठवडे बाजारात शेतकरी अन् ग्राहकांची मोठी फजिती

**अक्षराज : सुनील क्षिरसागर**

**दि.०२, विंचूर (नाशिक) :** येथील प्रसिद्ध आठवडे बाजारात गुरुवारी सलग दुसऱ्या आठवड्यात अवकाळी पावसाने जोरदार हजेरी लावली. दुपारी बाजार रंगात आलेला असतानाच अचानक आलेल्या पावसाच्या सरींमुळे भाजीपाला उत्पादक शेतकरी, व्यापारी आणि ग्राहकांची मोठी तारांबळ उडाली.

विंचूर येथील गुरुवारचा आठवडे बाजार हा परिसरातील २५ ते ३० गावांसाठी महत्त्वाचा केंद्रबिंदू आहे. सकाळपासूनच शेतकरी आपला शेतमाल, विशेषतः पालेभाज्या आणि फळभाज्या घेऊन बाजारात दाखल झाले होते. मात्र, दुपारी ३ वाजेच्या सुमारास आकाशात काळे ढग जमा झाले आणि



पाहता पाहता विजांच्या कडकडाटासह पावसाला सुरुवात झाली.

उघड्यावर मांडलेला भाजीपाला वाचवण्यासाठी शेतकऱ्यांनी प्लॅस्टिक कागदाचा आधार घेतला, मात्र वाऱ्याचा वेग जास्त असल्याने अनेकांचा माल भिजला व शेतकऱ्यांची धावपळ उडाली.

गेल्या गुरुवारीही असाच पाऊस आला होता. आज पुन्हा पाऊस आल्याने शेतातून मोठ्या अपेक्षेने आणलेला शेतकरी वर्गाचा माल भिजला आहे. आधीच शेतीमालाचा भाव पडलेला असून त्यात अशा नुकसाला सामोरे जात असल्याने शेती करणे कठीण झाले आहे.

**- संजय शेवाळे (माजी पंचायत समिती सदस्य)**

**५ मिनिटांच्या पावसात**

बाजार करण्यासाठी आलेल्या ग्राहकांना डोक्यावर पिशव्या धरून सुरक्षित निवारा शोधावा लागला. अचानक आलेल्या पावसामुळे भाजीपाला खरेदी करण्याऐवजी स्वतःचा जीव वाचवणे आणि भिजण्यापासून वाचणे यालाच लोकांनी प्राधान्य दिले.

**बाजार विखुरला**

सलग दुसऱ्या गुरुवारी पावसाने हजेरी लावल्याने व्यापाऱ्यांमध्ये चिंतेचे वातावरण आहे. मेथी, कोथिंबीर, पालक यांसारख्या पालेभाज्या पाण्यात भिजल्याने त्या खराब होण्याची भीती व्यक्त होत आहे. पावसाच्या जोरामुळे ग्राहकांनी काढता पाय घेतल्याने विक्रेत्यांना आपला माल कवडीमोल भावाने विकावा लागला किंवा सोडून घरी जावे लागले.

# पाटण रोटरी क्लब यांच्यावतीने महिला कर्मचाऱ्यांचा सत्कार

**अक्षराज : सुरेश संकपाळ**

**दि.०२, पाटण (सातारा) :** पाटण रोटरी क्लबच्या वतीने पाटण तालुक्यातील महिला पोलीस पाटील तसेच महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ एस टी कर्मचारी कार्यरत असणाऱ्या सर्व महिलाचा सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमासाठी रोटरी क्लबचे सुधीर लातुरे, संगीता लातुरे, जगदीश वाघ, राजगोपाल तापडिया यांची प्रमुख उपस्थिती होती.

या कार्यक्रमात गावपातळीवर कायदा व सुव्यवस्था राखणाऱ्या पोलीस पाटील तसेच प्रवासी सेवेतील महत्त्वाची भूमिका पार पाडणाऱ्या एस.टी महामंडळातील महिला कर्मचाऱ्यांचा शाल, श्रीफळ व प्रमाणपत्र देऊन त्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी मान्यवरांनी महिलांचे समाजातील योगदान अधोरेखित करत त्यांच्या कर्तृत्वाचे कौतुक केले. महिलांनी सर्वच क्षेत्रात आपली छाप पाडली असून, अशा सन्मानामुळे त्यांना अधिक प्रेरणा मिळेल, असे मत सुधीर लातूर यांनी व्यक्त केले.

याच कार्यक्रमाची सुरुवात नारळवाडी मल्हारपेठ या ठिकाणी उभारण्यात आलेल्या बस स्टॉप चे उदघाटन तसेच सुभाषनगर अडुळ याठिकाणी जनावरांसाठी मोफत जंत निवारण व लाळ खुरकत लसीचे लसीकरण करण्यात आले. रोटरी



क्लब साठी गेली ४० वर्ष अविरत सेवा देणाऱ्या ज्येष्ठ सदस्यांचा सन्मान, रोटरी डिस्ट्रिक्ट कडून केला.

तसेच दिव्यांग व्यक्तीसाठी रोटरी सक्षम व महिलां साठी रोटरी आत्म निर्भर या पुरस्काराचे वितरण करणेत आले. तसेच रोटरी क्लब पाटणचे अध्यक्ष जगदीश शेंडे व सचिव किशोर तुळसणकर सर्व सदस्यांनी कार्यक्रमाचे आयोजन केले होते. हा उपक्रम महिलांना प्रोत्साहन देणारा असून भविष्यातही समाजोपयोगी कार्यक्रम राबविण्याचा संकल्प यावेळी व्यक्त करण्यात आला.या कार्यक्रमासाठी मोठ्या संख्येने महिला, नागरिक व रोटरी क्लबचे सदस्य उपस्थित होते.

# येरमाळा नगरी सज्ज : येडेश्वरी देवीच्या यात्रेची धामधूम सुरू

**अक्षराज : अर्जुन कवडे**

**दि.०१, येरमाळा (धाराशिव) :** दिनांक ०१ एप्रिल २०२६ रोजी येथील श्री येडेश्वरी यात्रा गुरुवारपासून सुरुवात होत आहे. यात्रा सुरळीत पार पाडण्यासाठी यावर्षी जिल्हा प्रशासनाने विविध उपाय योजना केल्या आहेत. राज्यातील भाविकासह यात्रेसाठी विविध व्यावसायिक दाखल झाले आहेत.

कोल्ड्रिंक्स, किराणा, नारळ, मिठाईवाले, भांडी, खेळण्याचे दुकान तसेच मनोरंजनाची रहाट पाळणे यात्रेसाठी दाखल झाले आहेत. कायदा



सुव्यवस्था व गर्दीमुळे वाहतूक कोंडी होऊ नये आणि गर्दीचा फायदा घेऊन पाकीट मारी होऊ नये. म्हणून प्रशासनाने संपूर्ण व्यवस्था केलेली आहे.

तसेच उड्डाणपुलापर्यंत पाच किलोमीटर अंतराच्या परिसरात सीसीटीव्ही बसविण्यात आले आहेत. गेल्या वर्षी प्रमाणे यात्रा यंदाही सीसीटीव्हीचे नियंत्रणात निर्विघ्न पार पडणार असून याचा काळात अनुचित प्रकारावर नियंत्रण येणार आहे.

पहिलाच पौर्णिमेला भाविकांची गर्दी होईल. असे चित्र दिसत आहे येडेश्वरी मंदिर परिसर प्रचंड गर्दीने फुलून गेला आहे.

